MHKO070009342023

**<u>रे.दि.मु.नं.११०/२०२३ मधील नि.४३ खालील आदेश</u>**

प्रस्तुत अर्ज वादी क्र.४ ने मयत वादी क्र.१ चंपाबाई शंकर कांबळे हिचे वारस अभिलेखावर घेणेकरिता दाखल केला आहे.

२. वादीचे कथन की, वादी क्र.१ चंपाबाई शंकर कांबळे ही दि.०२/०२/२०२५ रोजी मयत झाली आहे. त्यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे एक वारस असून त्यांना दाव्यात वादी क्र.१ चे वारस म्हणून सामिल करणे आवश्यक आहे.

३. सदर अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे देवून असे कथन केले की, अर्जास प्रतिज्ञापत्र दाखल केलेले नाही. मयत वादी क्र.१ हिचे वारस स्वत:हून आले नाहीत त्यामुळे नियोजित वारस वादी म्हणून तयार आहेत किंवा नाही याचा बोध होत नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा चालू असताना वादी क्र.१ चंपाबाई शंकर कांबळे ही दि.०२/०२/२०२५ रोजी मयत झाली आहे. परंतु वादी क्र.१ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर न घेतल्याने दावा अबेट झाला होता. सदर आदेश आजरोजी रद्द करणेत आलेला आहे. वादीच्या कथनानुसार अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादी क्र.२ यास फक्त एक वारस आहे. प्रतिवादींनी सदर अर्जास म्हणणे देवून वादीचे सदर कथन नाकारलेले नाही. सदर वादी क्र.१ च्या मृत्यूनंतर त्यांचे वारसांच्या रुपात त्यांचा दावा मिळकतीमध्ये असणारा हक्क व अधिकार जीवंत राहणार आहे. अशा परिस्थितीत दाव्याचा संपूर्णपणे व कायमस्वरुपी न्यायनिर्णय होणेकामी मयत वादी क्र.१ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी व प्रतिवादी यांचेतील मुळ वाद संपुष्टात येणार नाही व नवीन दावे दाखल होण्याची शक्यता निर्माण होणार आहे.

५.	प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही. सबब, मी खालील आदेश पारीत करत आहे -

**<u>आदेश</u>**

१.	अर्ज (नि.४३) मंजुर करण्यात येतो.

२.	वादींना आदेशीत करणेत येते की, त्यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेवून दाव्याची प्रत न्यायालयात विहीत मुदतीत हजर करावी.

PRASHANTKUMAR ASHOK PATIL
Digitally signed by PRASHANTKUMAR ASHOK PATIL
Date: 2025.08.13 15:59:25 +0530

**(पी.ए.पाटील)**
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
जयसिंगपूर.

दिनांक १३/०८/२०२५.